REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2022

# चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक बचत करण्यासंबंधीचे अध्ययन

प्रा. मनोहर रामचंद्र चौधरी[१] , डॉ. राधेशाम पिलाजी चौधरी[२]
[१]संशोधनकर्ता
[२]मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

## सारांश

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासावरून रूढी, परंपरा, नीतीनियम हे कुटूंबातच मुलांना मिळत होते. म्हणून कुटूंबाला प्राथमिक शिक्षणाचे केंद्र समजत असत. प्राचीन काळी संयुक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात होती. दोन-तिन किंवा त्यापेक्षाही जासत भावांचे कुटूंब एकत्र असायचे. परंतु अलीकडे या पध्दतीत बदल होऊन विभक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात आली. माता पित्यांना मुलांकडे लक्ष देणे अशक्य झाले त्यामुळे संस्कार हरपले. परिणामी मुलांच्या संगोपणाचे कार्य निरनिराळया संस्थांनी हाती घेतले.



प्रस्तुत अध्ययनात चंद्रपूर जिल्ह्यातील ३७५ अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिसांकडून संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान संबंध तपासण्याकरीता काई वर्ग परिक्षण या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले.

## प्रस्तावना

भारतीय समाजव्यवस्थेच्या इतिहासावरून रूढी, परंपरा, नीतीनियम हे कुटूंबातच मुलांना मिळत होते. म्हणून कुटूंबाला प्राथमिक शिक्षणाचे केंद्र समजत असत. प्राचीन काळी संयुक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात होती. दोन-तिन किंवा त्यापेक्षाही जासत भावांचे कुटूंब एकत्र असायचे. परंतु अलीकडे या पध्दतीत बदल होऊन विभक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात आली. माता पित्यांना मुलांकडे लक्ष देणे अशक्य झाले त्यामुळे संस्कार हरपले. परिणामी मुलांच्या संगोपणाचे कार्य निरनिराळया संस्थांनी हाती घेतले.

विभक्त कुटूंबातील पती-पत्नी अर्थप्राप्तीच्या हेतूने अथवा नोकरीच्या निमित्ताने बाहेर पडल्यानंतर घरी कोणातीही जबाबदार व्यक्ती मुलांना सांभाळावयास उपलब्ध नसल्याने विविध संस्था, पाळणाघरे, आंगणवाडी, बालवाडी शाळा इत्यादीच्या रूपाने मुलांच्या संगोपणाकडे वळल्या. मुलांची काळजी घेणे व त्यावर संस्कार करणे, मुलांचा सर्वांगीन विकास घडवून आणणे या विचारसरणीचीही जोपासना होऊ लागली. आंगणवाडीच्या शिक्षणामुळे मुलांना चांगली शिस्त लावता येते का? त्यातील शिक्षणामुळे काही विकासात्मक बदल जाणवतो का?

बालकांच्या सामाजिक आणि मानसिक आरोग्यामध्ये अंगणवाडी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते का? अंगणवाडीत बालकांना कोणत्या सोय- सुविधा उपलब्ध आहेत आणि या सुविधांबाबत सेविका समाधानी आहेत का? इत्यादी प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

भारत हा जगातील सर्वात जास्त बालसंख्या असलेला देश आहे. देशाच्या विकास कार्यक्रमांच्या पत्रिकेवर बालविकास हा अग्रक्रम असलेला विषय आहे. परंतु ज्या योजना बालविकासाच्या दृष्टीने राबविण्यात येत आहेत त्यासंबंधी काही प्रश्न सहजच मनात निर्माण होतात.

बालकांसाठी असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतात का? त्याच्या कृती किती प्रभावी आहेत? संसाधनांचे जे एकत्रीकरण नियोजनकर्त्यांना अभिप्रगत होते तसे प्रत्यक्षात येते काय? मुलांच्या जीवनमानावर दृष्य असा प्रभाव पडला आहे काय? नव्याने समोर येणाऱ्या गरजा भागविण्यासाठी या सेवांमध्ये पुरेशी वाढ होत आहे काय? लवचिकता येत आहे काय? खर्चाच्या प्रमाणात हा कार्यक्रम कितपत परिणामकारक ठरतो? हे शोधण्याची गरज आज निर्माण झालेली आहे.

संयुक्त पुरोगामी आघाडीचा सामाजिक किमान कार्यक्रम सांगते, की "केंद्रीय पुरोगामी आघाडी प्रत्येक बस्तीमध्ये कार्यरत अंगणवाडी उपलब्ध करून आणि सर्व बालकांना लाभाच्या अंतर्गत समाविष्ट करून एकात्मिक बाल विकास योजनेचे सार्वत्रिकीकरण करेल. मा. केंद्र शासनाचे वचन आणि आयुक्ताचा अहवाल परस्पर विरोधी असल्याचे दिसते. देशभरात सध्या फक्त सात लाख आंगणवाड्या आहेत. देशात १४ लाख आंगणवाड्यांची आवश्यकता असल्याचा अंदाज सादर करण्यात आला होता. मात्र भारत सरकारने २००६ मध्ये तो अस्विकृत केला. वस्तीची लोकसंख्या १००० असल्यास ६ वर्षाखालील बालकाची संख्या १५० ते १६०, गर्भवती स्त्रीया किंवा स्तनदा मातांची संख्या ३५ ते४० व किशोरवयीन बालकाची संख्या ७५ ते ८० असेल तर २०११ मधील जनगणनेच्या आधारे काढण्यात आले.

**सारणी क्रमांक १ :**
**चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना इतर स्त्रोतांपासून मिळणाऱ्या मासिक उत्पन्नासंबंधी माहिती**

| इतर स्त्रोतांपासून मिळणारे मासिक उत्पन्न | वारंवारिता | टककेवारी |
|---|---|---|
| रू. २००० पेक्षा कमी | १८६ | ४९.६ |
| रू. २००० ते ४००० | १२६ | ३३.६ |
| रू. ४००१ ते ६००० | ४३ | ११.५ |
| रू. ६००० ते ८००० | १७ | ४.५ |
| रू. ८००० पेक्षा अधिक | ३ | ०.८ |
| **एकूण** | **३७५** | **१००** |
| **काई वर्ग मूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| **३२६०५८७** | **४** | **<०.०५** |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना इतर स्त्रोतांपासून मिळणाऱ्या मासिक उत्पन्नासंबंधी माहिती दर्शविण्यात आले आहे. वरील सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४९.६ टक्के अंगणवाडी सेविकांना इतर स्त्रोतांपासून मिळणारे मासिक उत्पन्न रु. २००० पेक्षा कमी असून ३३.६ टक्के अंगणवाडी सेविकांना इतर स्त्रोतांपासून मिळणारे मासिक उत्पन्न रु.२००० ते ४००० होते. त्याचप्रमाणे इतर स्त्रोतांपासून प्राप्त होणारे मासिक उत्पन्न रु. ४००१ ते ६००० व रू. ६००० ते ८००० असणाऱ्या अंगणवाडी सेविकांची टक्केवारी अनुक्रमे ११.५ टक्के व ४.५ टक्के होते. तसेच ०.८ टक्के अंगणवाडी सेविकांना इतर स्त्रोतांपासून मिळणारे मासिक उत्पन्न रु. ८००० पेक्षा अधिक असल्याचे आढळून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांदरम्यान इतर स्त्रोतांपासून मिळणाऱ्या मासिक उत्पन्न रु. २००० पेक्षा कमी अंगणवाडी सेविकांची टक्केवारी सर्वाधिक असल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्रमांक २ :**

**चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनिसांद्वारे आर्थिक बचत करण्यासंबंधी त्यांच्या प्रतिक्रीया**

| बचत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३५८ | ९५.५ |
| नही | १७ | ४.५ |
| **एकूण** | **३७५** | **१००** |
| **काई वर्ग मूल्य** | **स्वातंत्र्यांश** | **P मूल्य** |
| **३१०.०८३** | **१** | **<0.05** |

प्रस्तुत सारणी क्रमांक २ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनिसांच्या आर्थिक बचत करण्यासंबंधी त्यांच्या प्रतिक्रीया दर्शविलेल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ९५.५ टक्के अंगणवाडी मदतनिस आर्थिक बचत करतात तर ४.५ टक्के अंगणवाडी मदतनिस आर्थिक बचत करीत नसल्याचे दिसून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनिसांच्या आर्थिक बचत करण्यासंबंधी तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३१०.०८३; स्वातंत्र्यांश – १; P मूल्य <0.05) अंतर आढळून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनिसांदरम्यान आर्थिक बचत करणाऱ्या अंगणवाडी मदतनिसांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष

सारणी क्रमांक १ मधिल माहितीनूसार चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक बचत करण्यासंबंधी तुलना केली असता केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३१७.४; स्वातंत्र्यांश – १; P मूल्य <0.05) अंतर निदर्शनास येते. चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांच्या आर्थिक बचत करणाऱ्या अंगणवाडी सेविकांची संख्या जास्त आहे. सारणी क्रमांक १ मधिल माहितीनूसार चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनिसांच्या आर्थिक बचत करण्यासंबंधी तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ३१०.०८३; स्वातंत्र्यांश – १; P मूल्य <0.05) अंतर आढळून येते. चंद्रपूर जिल्ह्यातील अंगणवाडी मदतनिसांदरम्यान आर्थिक बचत करणाऱ्या अंगणवाडी मदतनिसांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते. या वरून अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस यांच्या मध्ये बचतीचे प्रमाण चांगले आहे असे दिसून येते.

## संदर्भग्रंथ सूची


- आगलावे, प्रदिप, २००७, ‘नमुना निवडीचे तंत्र’, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- आगलावे, प्रदिप, २०००, संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.
- आगलावे, प्रदिप, २००३, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- काळे, प्रेमला, २०००, बाल मानसशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
- गणोरकर, मीना, १९८२, बालविकास आणि संबधित क्षेत्र, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.
- जुननकर, कुसूम, २०००, मातृत्व आणि बालसंगापण, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
- तारणेकर, मीनाक्षी, १९९९, पोषण आणि स्वास्थ्य, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रब्युटर्स, नागपूर.
- महाजन, प्रमोद, १९८७, बालकांचे निरामय आरोग्य आणि संगोपण, विमल पब्लिकेशन्स.
- खोबे, २००५, महिला व बालकल्याण विभाग, जि. चंद्रपूर अंगणवाडी, मार्गदर्शिका व पुर्व शालेय शिक्षण अभ्यासक्रम पुस्तिका.
- महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभाग द्वारा प्रकाशित मार्गदर्शिका, माता व बालक संरक्षण कार्ड.
- शेटे, २००५, एकात्मिक बालविकास सेवा योजना, ग्रामीण प्रकल्प, चंद्रपूर योजनेचे माहिती पत्रक.